CIN: L74999MH2016PLC284731
Nirmitee Robotics India Limited
(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

To,

BSE Limited

Phiroze Jeejeebhoy Towers,

Dalal Street,

Mumbai - 400001

**Scrip Code:** 543194

**Sub:** Notice published by way of an advertisement in respect of Extra Ordinary General Meeting (EOGM) of the Company.

**Ref:** Regulation 44 and 47 read with Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015

Dear Sir/Ma'am,

Pursuant to Regulation 44 and 47 read with Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith the copies of newspaper advertisements published in **"Mahasagar Nagpur"** (Marathi edition) and the **"Financial Express"** (English edition) on 13th February, 2025 informing about Extra Ordinary General Meeting (EOGM) of the Company.

For your information and record.

Kindly acknowledge and oblige.

**Thanking you,**

**Yours faithfully,**

**For Nirmitee Robotics India Limited**

NEELAM BAHLANI Digitally signed by NEELAM BAHLANI Date: 2025.02.13 16:37:55 +05'30'

**Neelam Bahlani**
**Company Secretary cum Compliance Officer**
**Date:** 13/02/2025
**Place:** Nagpur

# ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीत टास

**तीन हजार कर्मचारी बेरोजगार नगर पंचायतीत समावेश नाही, उदरनिर्वाहाची पडली चिंता**

**महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. १२ :** ग्रामपंचायतीचे नगर पंचायतीमध्ये २०१९ पासुन रूपांतर झाले. मात्र, ग्रामपंचायतीच्या हजारो कर्मचाऱ्यांचे समायोजन करून घेण्यात आले नाही. त्यामुळे शासन विरोधात महाराष्ट्र राज्य नगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने मंगळवार २५ ब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता संविधान चौक ते विभागीय आयुक्त नागपुर कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहीती संघटनेचे अध्यक्ष विश्वनाथ घुगे यांनी दिली. नागपूर व अमरावती विभागातील जवळपास तीन हजार कर्मचा ऱ्यांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले आहे. अनेक वर्षे ग्रामपंचायतीत सेवा देणारे हे कर्मचारी आज हालाखीचे जीवन जगत आहेत. त्यांना उदरनिर्वाहाची चिंता आहे. नगर पंचायत, नगर परिषद कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्नही दीर्घ काळापासून शासन दरबारी प्रलंबित आहेत. आदिवासी व नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या नगर परिषद, नगर पंचायतीमधील कर्मचऱ्यांना शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्यात चालढकल केली जात आहे.साई विभागातील लाड कमिशनची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. अनुकंपा तत्त्वावरची प्रकरणेही रखडलेली आहेत.ठेका पद्धतीमुळे अडचणी वाढल्या आहेत.नगर परिषद, नगर पंचायतीच्या साई विभागात ठेका पद्धत सुरू झाली आहे. यामुळे साई कामगारांच्या अडचणी वाढल्या आहेत. या कर्मचाऱ्यांना मोत घरे बांधून देण्याची योजना राबविण्याची आवश्यकता सांगितली जात आहे.

**मुख्यमंत्र्यांना घातले साकडे**

**नागपूर व अमरावती विभागातील नगर परिषद, नगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. ते सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र डणवीस यांना साकडे घालण्यात आले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य नगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, कंत्राटी कामगार संघटनेने पत्र दिले असल्याची माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे यांनी दिली आहे.**

नगर परिषद, नगर पंचायतीमधील कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार थकबाकीसह वेतन अदा करण्याची मागणी आहे.साई कामगारांचे आर्थिक लाभ रखडले आहे.नगर परिषद, नगर पंचायतीमधून सेवानिवृत्त झालेल्या साई कामगारांची आर्थिकविषयक प्रकरणे दीड वर्षापासून प्रलंबित आहेत. उपदान, सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ त्यांना देण्यात आला नाही. नागपूर विभागात तर अमरावती विभागात साई कर्मचारी लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. साई कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती थांबली आहे. कंत्राटी पद्धतीने सेवेत घेण्यात आलेल्या या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतनाचा लाभ दिला जात नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी या मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहन , विश्वनाथ घुगे,पि. बी. भातकुले, धर्मा खिल्लारे, दिपक रोडे, मारोती गायकवाड, जयदिप सोनखासकर, पद्मकिशोर उंटवाल तसेच नागपुर विभागातील संघटनेचे प्रदेश कार्यकारणी, पदाधिकारी, सदस्य, तसेच स्थानीक संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव व सर्व कर्मचारी वृंदानी केले आहे.



# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात पेरियोडिक टेबल डे उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. १२ :** येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाद्वारे पेरियोडिक टेबल डे उत्साहात साजरा करण्यात आला. या औचित्याने मूलद्रव्यांचे वर्गीकरण असलेल्या पेरियोडिक टेबलवर आधारित पोस्टर कॉम्पिटिशन आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन कोंगरे हे प्रमुख वक्ते असून त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात मूलद्रव्यांचे वर्गीकरण सुसूत्ररित्या झाल्यामुळे रसायनशास्त्राचा अभ्यास सुलभ झाल्याचे सांगितले. यालाच सिस्टिमॅटिक क्लासिकेशन ऑ एलिमेंट्स असेही म्हटले जाते व याविषयी माहिती विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचावी या उद्देशाने ७ फेब्रुवारी हा दिवस पेरियोडिक टेबल डे म्हणून साजरा केला जात असल्याचे सांगितले.

पोस्टर स्पर्धेमध्ये बी.एससी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी आयशा शेख हिला प्रथम पारितोषिक मिळाले. पदवी आणि पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये उत्स्र्त सहभाग नोंदविला. संचालन डॉ. अविनाश इंगोले यांनी तर आभार प्रा. अक्षय पाटील यांनी मानले. यावेळी प्रा. प्रणाली उमरेडकर, प्रा. प्रांजली दारूंदे, प्रा. सिद्धार्थ लोणारे, अनिल चांदेकर, दिनेश मानकर उपस्थित होते.

# नांदोरा शिवारातील पोल्ट्री फार्मवर शेतात गांजाची शेती

**तीन आरोपींना अटक**

**८१ हजारांचा मुद्दे माल जप्त**

**पोलिसांकडून शेतमालकाचा शोध**

**महासागर प्रतिनिधी,**
**स्वप्निल राऊत**
**काटोल, दि. १२:**तालुक्यातील कोंढाळी पोलीस स्टेशन अंतर्गत येथून पाच कि मि अंतरावरील नांदोरा येथील पोल्ट्री फार्म उत्पादकाचे शेतात पोल्ट्री फार्म लगत आजूबाजूला गांजाच्या शेतीचा प्रकार उघड झाल्यानंतर पोलिसांनी कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी यांनी फरवरी ला रात्री शोधसत्र दरम्यान . पोल्ट्री फार्म उभारण्यात आलेल्या शेतात अमली पदार्थांचे झाडे गांजाची झाडांपासून अंदाजे एक किलो चे वर वजनाचे आमली पदार्थ कोंढाळी पोलीस व नागपूर जिल्हा ग्रामीण क्राईम ब्रांच चे पोलीस पथक यांनी जप्ती ची कार्यवाही केली. यात कोंढाळी ठाणेदार राजकुमार त्रिपाठी, पो उ नि धवल देशमुख ,व स्टाफ तसेच क्राईम ब्रांच चे अधिकार्यांनी नांदोरा



येथील पोल्ट्री फार्म/घटना स्थळ गाठून फेब्रूवारी रोजी रात्री शोध सत्र मोहीम राबविली. या प्रकरणी कोंढाळी पोलीसांनी येथील पोल्ट्री फार्म वरू जप्त केलेल्या झाडांपासून अंदाजे ८१हजार पेक्षा ज्यास्त किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी शेत मालकासह तीन आरोपींवर कारवाई करण्यात आली असून या पैकी तीन आरोपीचा १३फेब्रूवारी पर्यंत पी सी आर घेण्यात आला असून उर्वरित आरोपीत शेत मालकाचा शोधसत्र सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या मधे आरोपी शेख जावेद शेखब्बू,(३८)शनिचरा कोंढाळी, शेख इद्रिस शेख युनुस(३७) वर्धा रोड कोंढाळी,आसिफ अली अशरफ अली सैय्यद (३७) शनिचरा कोंढाळी यांना ताब्यात घेऊन कोंढाळी पोलीस तसेच नागपूर जिल्हा (ग्रामीण) क्राईम ब्रांच चे अधिकारीं कडून कोंढाळी पोलीस स्टेशन मधे आरोपीचे विरोधात भा.न्या. सं. चे कलम ८ब,२० अ, २९ एन डी पी एस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तिन्ही आरोपिंना काटोल न्यायालयाल हाजर केले असता १३फेब्रूवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर शेत मालक शेख अनिस शेख यांचा रा नागपूर यांचा शोध गुन्हे शाखा व कोंढाळी पोलीस शोध घेत आहेत. या प्रकरणी ८१हजाराचा मुद्दे माल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक, हर्ष पोद्दार, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रमेश धुमाळ, काटोल चे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूसाहेब रोहम, यांचे मार्गदर्शनाखाली कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी - स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, ए पी आय आशिष सिंह ठाकुर व स्टाफ पुढील कार्यवाही करत आहे.

# धरमपेठ विद्यालयात विद्यार्थ्यांचा सन्मान आणि बाराव्या वर्गाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. १२ :**

डिफेन्स येथील धरमपेठ विद्यालयाशी संबंधित सर्व वाहन चालकांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांसाठी विविध वार्षिक स्पर्धांचे पुरस्कार वितरण व बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आदी कार्यक्रम आयोजित केले. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे विद्यापीठ आणि राष्ट्रीय कबड्डी आणि क्रीडा समन्वयक राजेश भूते , शाळा समितीचे अध्यक्ष दीपक दुधाने , प्राचार्य विजय मुंगाटे उपस्थित होते. सर्व वाहन चालकांना शाल, श्रीळ देऊन सन्मानित केले गेले. मुलांनी शिक्षणासोबतच मैदानी खेळांकडे लक्ष दिले पाहिजे आणि सर्व मुलींनी येणाऱ्या परिस्थितीचा सामना करता येण्यासाठी स्वतःला



सक्षम बनवले पाहिजे असे आवाहन राजेश भूते यांनी केले. वाहन चालक आपल्या जीवनात एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ते आपल्याला आपल्या गंतव्यस्थानापर्यंत सुरक्षित पोहचण्यास मदत करतात. या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी ते सन्मानास पात्र असल्याचे मत शाळासमिती अध्यक्ष दिपक दुधाने यांनी प्रकट केले. शाळेचे प्राचार्य विजय मुंगाटे यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभकामना देऊन विद्यार्थ्यांची दिशा स्पष्ट असली पाहिजे असे सांगितले.

विविध शालेय स्पर्धांमध्ये प्रथम , द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थींना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार वितरीत करण्यात आले. आयोजनासाठी नम्रता नेमाडे , निधी सकलानी, रश्मी पाटील व वर्ग अकरावीच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन काजल शंभरकर आणि मनाली भोयर यांनी केले. यावेळी शाळा प्रभारी राखी सरोदे, आराधना सिंग, उज्जवला अहेर, वसंत निकम, लता सिंग, मनीषा सातपूते, निक्की सिंग, चैताली दंडारे, श्वेता श्रीवास, विद्या लोखंडे, मंगला गजभिये, वैभव सरोदे, अभिषेक गजभिये, शिल्पा बिसेन, नीलू रामा राय, वैशाली हरदास, गरिमा शिंगाडे, अर्चना टे, अश्विनी खाडे, नलिनी पाटील, सोनल मिश्रा आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# डब्ल्यूसीएल संचालक (कार्मिक) डॉ. एच.एस. पांडे यांनी प्रादेशिक मानसिक रुग्णालयात सीएसआर अंतर्गत प्रदान केलेल्या प्रगत वैद्यकीय उपकरणांचे उद्घाटन केले




**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १२ :**
डब्ल्यूसीएल ने त्यांच्या सीआरएस उपक्रमांतर्गत, प्रादेशिक मानसिक रुग्णालयाला ६८ लाख रुपयांच्या आर्थिक सहाय्याने प्रगत वैद्यकीय उपकरणे प्रदान केली आहेत., ११ फेब्रुवारी २०२५ रोजी, या उपकरणांचे उद्घाटन डब्ल्यूसीएल संचालक (कार्मिक), डॉ. एच.एस. यांनी केले. पांडे यांनी केले. डॉ. एच. एस. पांडे यांनी यावेळी सांगितले की, सीएसआर अंतर्गत सामाजिकदृष्ट्या कामांमध्ये डब्ल्यूसीएल आपली भूमिका बजावते. प्रादेशिक मानसिक रुग्णालयातील या प्रगत उपकरणांमुळे रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या उपकरणांमध्ये सीबीसी मशीन, मॉनिटर्स, व्हील-चेअर इत्यादी तसेच आरटीएमएस (रिपीटिव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्नेटिक स्टिम्युलेशन) मशीनचा समावेश आहे, जे मानसिक आरोग्य रुग्णांना नॉन-इनवेसिव्हउपचार प्रदान करते. या उपकरणांच्या मदतीने, प्रादेशिक मानसिक रुग्णालय रुग्णांना अत्याधुनिक उपचार देऊ शकेल, ज्यामुळे रुग्णालयाला आता महाराष्ट्र सरकारच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति रुग्ण छ ११०००, ची अतिरिक्त रक्कम मिळू शकेल. यामुळे रुग्णालयाची आर्थिक स्थिती सुधारेल आणि आरोग्य सेवांचा विस्तार करता येईल.

उद्घाटन समारंभाला वैद्यकीय अधीक्षक, प्रादेशिक मानसिक रुग्णालय, सतीश हुमणे आणि महाव्यवस्थापक (सीएसआर/कल्याण), डब्ल्यूसीएल, ए. उपस्थित होते. च्या. सिंग यांची विशेष उपस्थिती होती.

नागपूर येथील प्रादेशिक मानसिक रुग्णालय गेल्या १२० वर्षांहून अधिक काळ विदर्भ, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड भागातील रुग्णांना वैद्यकीय सेवा देत आहे हे ज्ञात आहे.

# कन्हान कांद्री येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त घरघर संविधान




**समाजकल्याण विभगामार्फत उपक्रम नागरिकांनी घेतला सहभाग**

**महासागर प्रतिनिधी,**
**नरखेड, दि. १२:** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त घरघर संविधान या उपक्रमांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, नागपूर यांच्या वतीने संविधान चित्ररथाचे आगमन कन्हान व कांद्री येथे झाले हा उपक्रम सामाजिक न्याय विभाग सहाय्यक आयुक्त सौ सुकेशिनी तेलगोटे बेले यांनी व यांच्या समाज कल्याण विभागाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाला प्रामुख्याने रामटेक विधानसभा भाजपा विस्तारक श्री मनोज चवरे, भाजपा जिल्हा महामंत्री श्री रिंकेश चवरे, भाजपा तालुका उपाध्यक्ष श्री शिवाजी चकोले, भाजपा कांद्री शहर अध्यक्ष गुरुदेवजी चकोले, कृष्णदास गजभिये, समाज कल्याण विभागाचे राजेश राठोड, हरिश्चंद्र ठाकरे, संजय कुमार शिंदे, स्वप्निल बनसोडे, चंदा वैद्य संतोष मधुमटके, संदीप कापसे, ज्ञानेश्वर वैद्य, शिवदास ठाकरे, कैलास आकरे, श्याम मस्के, चंदा वैद्य, बेबीनंदा लिंगायत, पंकज मस्के, सोनू मधुमटके, विधीलाल डहारे, क्रीष्णा वरखडे, दीपा साकोरे, प्रवीण आकरे, जगदीश आकरे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

# एमपीएससी परीक्षेत महेश्वरी नाटकर उत्तीर्ण



**महासागर प्रतिनिधी,**
**रामटेक , दि. १२ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एम.पी.एस.सी.) वतीने गट-क पदांसाठी डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दि.११ ब्रुवारी २०२५ ला नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत रामटेक तालुक्यातील हिवरा (हिवरी) या गावातील रहिवासी महेश्वरी सुरेश नाटकर ही उत्तीर्ण झालेली आहे.गट-कील पदांपैकी कनिष्ठ सहाय्यक या पदासाठी ती पात्र ठरली आहे. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य व्हावे या हेतूने महाज्योती या संस्थेर्ते घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत ती उत्तीर्ण झाली होती व तिला एक वर्षापर्यंत मासिक दहा हजार रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती.महाज्योतीच्या नियमानुसार मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या मदतीने महेश्वरीने पुणे येथे जाऊन जवळपास एक वर्ष स्पर्धा परीक्षेचा(एम.पी.एस.सी.) अभ्यास केला.महेश्वरी हिने या अगोदर महाराष्ट्र राज्य सहायक प्राध्यापक पात्रता परीक्षा (सेट) परीक्षाही राज्यशात्र या विषयात मागील वर्षी उत्तीर्ण केली आहे. ती खैरी(बिजेवाडा)रामटेक येथील विद्यासागर कला महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी आहे. महाराष्ट्र शासनार्ते एखाद्या विभागात लवकरच कनिष्ठ सहाय्यक या पदावर महेश्वरीची लवकरच नियुक्ती करण्यात येईल. एम.पी.एस.सी.ची परीक्षा उत्तीर्ण होऊन या पदावर पोहचणारी मुलींपैकी ती तिच्या गावातील पहिली मुलगी ठरणार आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील,कुटुंब,गुरुजन,मित्र परिवार यांना दिले असून सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

**वाडीत तीन दिवसीय श्री शिवजन्मोत्सव सोहळा रविवार पासून**

**महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. १२ :** येथील द ग्रेट शिवराजेफॉऊंडेशन, शिवराजे ढोल ताशा व ध्वज पथक आणि शिवराजे परिवार यांच्या सयुंक्त सहकार्याने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिव छत्रपती शिवाजी महाराजांचा तीन दिवसीय शिवजन्मोत्सव सोहळा रविवार १६ ते बुधवार १९ पर्यंत आदर्शवाडीतील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात आयोजित केला आहे.रविवार १६ ब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता गोंधळ प्रस्तुती व सोमवार १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. अभिषेक महाराज घुसे यांचे शिवचरित्रा वर व्याख्यान आणि तरुणांना मार्गदर्शन होणार आहे. मंगळवार १८फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता दिव्य ज्योत प्रज्वल सोहळा व पालखी सोहळा आयोजीत केला आहे. ही पालखी एमआयडीसी शिव मंदिर पासून सकाळी ८.३० वाजता निघणार आहे. बुधवार १९ सकाळी ८.३० वाजता शिवाजी महाराजांचा अभिषेक सोहळा व शिवराजे ढोल ताशा व ध्वज पथकाची मानवंदना सकाळी ९ ते दुपारी २ वाजता पर्यंत देण्यात येणार आहे. तसेच रक्तदान शिबिरचे आयोजन, गुरु साईच्छा शिवगीत संध्या आदी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.परिसरातील शिवभक्तांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन द ग्रेट शिवराजे फॉउंडेशन, शिवराजे ढोल ताशा व ध्वज पथक आणि शिवराजे परिवारांनी केले आहे.

# दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी, जी एच रायसोनी विद्यापीठ व यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली राष्ट्रीय फार्मा कॉन्क्लेव्ह २०२५ चे आयोजन

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १२:** दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी, नागपूर, जी.एच. रायसोनी विद्यापीठ, सायखेडा आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय () यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच यांच्या सहकार्याने दिनांक फेब्रुवारी रोजी डव्हान्सिंग अफोर्डेबल केअर: ब्रिजिंग इनोव्हेशन आणि ऍक्सेसिबिलिटी या विषयावर पहिली राष्ट्रीय फार्मा कॉन्क्लेव्ह यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली होती. हा कार्यक्रम रियान टॉवर, नागपूर येथील ऑडिटोरियम येथे झाला, ज्यात फार्मास्युटिकल उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ एकत्र आले. या कॉन्क्लेव्हमध्ये औषधींचा प्रयोगशाळेपासून मार्केटपर्यंतचा प्रवास, नवीन व्याधींवर औषधोपचार, बायोसिमिलर्स एक्सप्लोरिंग आणि रेग्युलेटरी इव्होल्यूशन यासह प्रमुख उप-थीमवरअंतर्दृष्टीपूर्ण पॅनेल चर्चा वैशिष्ट्यीकृत आहेत. तज्ज्ञांनी



औषध विकास, कार्यक्षम नियामक मार्ग आणि गुणवत्तेशी तडजोड न करता परवडणारी क्षमता सुनिश्चित करण्याच्या आवश्यकते वर भर दिला. मान्यवर प्रमुख वक्ते, डॉ. राजेश बहेकर, वरिष्ठ महाव्यवस्थापक, , अहमदाबाद आणि डॉ. श्रीकांत फुले, माजी - अधिकारी आणि प्लांट हेड, बैद्यनाथ, यांनी विकसित होणारे फार्मास्युटिकल ट्रेंड आणि रुग्णांना औषधांपर्यंत व्यापक उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आव्हाने यावर त्यांचे कौशल्य शेअर केले.

डॉ. मीना राजेश, डॉ. डी. सी. शाऊ, प्रोफेसर आणि डीन, जी.एच. रायसोनी विद्यापीठ, सायखेडा आणि डॉ. यू. एन. महाजन प्राचार्य दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॉन्क्लेव्ह यशस्वीपणे पार पडला. डॉ. अजय पिसे, कु. अनमोल धावंडे, डॉ. रितेश फुले, डॉ. कलीम, डॉ. देवश्री नांदूरकर, कु. अश्विनी इंगोले, कु. अमृता शेटे, कु. कृतिका सावरकर, कु. सुचित्रा मिश्रा, कु. अपुर्वा यांच्या अथक परिश्रमाने कार्यक्रमाच्या यशात मोलाचे योगदान दिले.

ज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी या कॉन्क्लेव्हने एक डायनॅमिक प्लॅटफॉर्म म्हणून काम केले. तसेच परवडणारी आणि योग्य आरोग्यसेवा सोल्यूशन्स चालविण्यासाठी शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन दिले.

CIN : L74999MH2016PLC284731
**Nirmitee Robotics India Limited**
Nirmitee
Innovation. Experience. Excellence
Registered Address: C/o Vithoba Healthcare and Research Private Limited, D 3/2, Hingna, MIDC, Nagpur, Maharashtra-440028 India Tel: +91 9422881677, E-Mail id: info@nirmiteerobotics.com, Website: https://www.nirmiteerobotics.com

**NOTICE TO MEMBERS OF NIRMITEE ROBOTICS INDIA LIMITED REGARDING EXTRAORDINARY GENERAL MEETING AND INFORMATION ON REMOTE E-VOTING**

1. NOTICE is hereby given that the Extra-ordinary General Meeting ("EGM") of Nirmitee Robotics India Limited ("the Company") will be held on Monday, 10th March, 2025 at 12.00 P.M. at the registered office of the company situated at C/o Vithoba Healthcare and Research Private Limited, D 3/2, MIDC Hingna, Nagpur, Maharashtra, India-440028 India, in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder and Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("LODR Regulations"), read with the General Circulars / Notifications issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA") and SEBI (collectively referred to as "applicable circulars"), to transact the business as set out in the Notice calling the EGM dated 12th February, 2025.
2. Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (as amended) and Regulation 44 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations 2015 (as amended), and applicable MCA Circulars the Company is providing facility of remote e-voting to its Members in respect of the business to be transacted at the EGM.
3. Notice of EGM has been sent on 12th February, 2025 only through electronic mode to those Shareholders whose email ids are registered with the Company/ Depositories/ Depository Participants/ RTA and appearing as on Friday, 7th February, 2025.
4. Shareholders may note that Notice of EGM along with instructions for e-voting are also be available on the Company's website https://www.nirmiteerobotics.com/notices-of-general-body-meeting/ and on the website of stock exchange at https://www.startupsbse.com/index.html.
5. A person, whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date, i.e., Monday, 3th March, 2025 only shall be entitled to avail the facility of remote e-voting, voting through ballot form / polling paper at EGM.
6. The Company is providing to its members' facility to exercise their right to vote on resolutions proposed to be passed at the EGM by electronic means ("e-voting"). The Company has engaged the services of Big Share Services Private Limited to facilitate e-voting. Members may cast their votes remotely, using the electronic voting system available on the website of Big Share Services Private Limited (agency for providing the Remote e-Voting facility) i.e. https://ivote.bigshareonline.com
7. The facility for voting through polling paper shall be made available at the meeting and the members attending the meeting who have not cast their vote by remote e-voting shall be able to vote at the Meeting through polling paper or Ballot form.
8. A member can opt for only single mode of voting i.e., either through e-voting or by Ballot Form. If a member cast votes by both modes, e-voting shall prevail and vote by Ballot shall be treated as invalid. The members who have cast their vote by remote e-voting/ballot form may also attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.
9. Information and instructions including details of user-id and password relating to voting have been sent to the members through email. Members who do not receive email whose email addresses are not registered with the Company/RTA, may generate login credentials by following the instructions given in the 'Notes' forming part of the Notice convening the EGM.

a. The remote e-voting facility will be available during the following period:
**Commencement of remote e-voting : 09.00 A.M. (IST) on Friday March 7, 2025**
**End of remote e-voting : 05.00 P.M. (IST) on Sunday, March 9, 2025**
b. The remote e-voting module shall be disabled by Big Share Services Private Limited for voting thereafter. The Members, whose names appear in the Register of Members / Beneficial Owners as on the record date (cut-off date) i.e., Monday, 3th March, 2025 may cast their vote electronically.

10. **Manner of registering / updating email id with the Company/ Depositories:**
a. For Demat shareholders - Please update your email id & mobile no. with your respective Depository Participant (DP).
b. For Individual Demat shareholders – Please update your email id & mobile no. with your respective Depository Participant (DP) which is mandatory while e-Voting.
All grievances connected with the facility for voting by electronic means may be addressed to Big Share Services Private Limited through an email ivote@bigshareonline.com or at the toll-free no.: 08069219070

For Nirmitee Robotics India Limited
Sd/-
Kartik Eknath Shende
Director (DIN : 02627131)

Place : Nagpur
Date : 13th February 2025

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३